जलयुक्त शिवार अभियान विशेष निधी व साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रम लेखाशिर्ष ४४०२ २४११ अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध करून दिलेला निधी खर्च करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
**जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः जलसं-२०१६/प्र.क्र.१९२/जल-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १४ मार्च, २०१७

**वाचा :-** **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः . जलसं - २०१६ /प्र.क्र.१९२/जल-७ दिनांक ३१ मार्च, २०१६ व दिनांक २७ ऑक्टोंबर, २०१६**

**प्रस्तावना :**

सर्वासाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थीतीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियाना राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये निवडण्यात आलेल्या गावांकरिता ₹ १६००.०० कोटी निधी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेला होता. तसेच साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रम लेखाशिर्ष ४४०२ २४११ या मधून एकुण ₹ ३९७.७७ कोटी निधी सिमेंट नाला बांधांस व नदी पुनर्जीवन अंतर्गत सिमेंट नाला बांधास उपलब्ध करून दिलेला होता.

२. सदरचे अनुदानापैकी अखर्चित राहणारी रक्कम आहरित करुन संबंधित जिल्हा परिषदेकडे सुपुर्त करण्यास, तसेच जिल्हापरिषदेने सदरच्या रक्कमेचे वितरण संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या निदेशानुसार संबंधित अंमलबजावणी यंत्रणेस करण्यास व सदर निधी दि.३० जून, २०१६ पर्यंत खर्च करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. तदनंतर सदर निधी ३१ डिसेंबर,२०१६ पर्यंत खर्च करण्यास शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोंबर, २०१६ च्या अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

३. राज्यात सन २०१६ मध्ये समाधानकारक पाउस झाला असल्याने शेतात तसेच ओढा/नाला यामध्ये डिसेंबर अखेर पाणी असल्याने मृद व जलसंधारणाची कामे करता आली नाहीत तसेच राज्यातील काही जिल्ह्यामध्ये परतीचा पाउस ही चांगला झालेला आहे त्यामुळे राज्यातील अनेक जिल्हाधिकारी यांचेकडून अखर्चित निधी खर्च करण्यास मुदतवाढ मिळण्याची मागणी करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने सदरची मुदत दि.३१/०३/२०१७ पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव जलसंधारण विभागाने शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत सादर केलेला होता. शक्ती प्रदत्त समितीमध्ये सदर प्रस्तावास मान्यता दिलेली आहे तसेच सदर प्रस्तावास वित्त विभागानेही मान्यता दिलेली आहे. वित्त विभागाने दिलेल्या परवानगी नुसार एक विशेष बाब म्हणून वर

नमूद लेखाशिर्षाखालील सन २०१५-१६ या वर्षाकरिता करण्यात आलेल्या तरतुदीपैकी अखर्चीत शिल्लक तरतुद खर्च करण्यास डिसेंबर, २०१६ अखेर पर्यंत दिलेली मुदतवाढ दि. ३१ मार्च, २०१७ पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

जलयुक्त शिवार अभियाना करिता सन २०१५-१६ मध्ये निवडण्यात आलेल्या गावांकरिता ₹ १६००.०० कोटी निधी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेला होता. तसेच साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रम लेखाशिर्ष ४४०२ २४११ या मधून एकुण ₹३९७.७७ कोटी निधी सिमेंट नाला बांधांस व नदी पुर्नजीवन अंतर्गत सिमेंट नाला बांधास उपलब्ध करून दिलेला होता. सदर निधी पैकी मार्च २०१६ अखेर अखर्चित निधी आहरित करून संबधित जिल्हा परिषद कडे काढून ठेवण्यास व त्यास जून २०१६ पर्यंत खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च २०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली होती. तदनंतर सदर मुदतवाढ एक विशेष बाब म्हणून दि.३१ डिसेंबर २०१६ पर्यंत दिनांक २७ ऑक्टोंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली होती. आता सदर निधीपैकी डिसेंबर २०१६ अखेर अखर्चित निधी दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर पर्यंत खर्च करणे बंधनकारक आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१/२०१७/व्यय-१५, दि.२/०१/२०१७ व क्र. ५६/अर्थोपाय दि. ०८/०२/२०१७ सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३१४१६२९५९६२२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae7faeabaf4571c2748e4dd5ffd2cd108de0e130859970f4d7d0ee40046b3e9e, cn=Narayan Karad
Date: 2017.03.14 18:56:29 +05'30'

**(ना.श्री.कराड)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव,
३. मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई.

९. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,
१०. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
१५. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. मुख्य अभियंता, वि.स.सिं.का. नागपूर
१७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१८. सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
१९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२२. सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण,
२३. सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उप वनसंरक्षक,
२४. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
२५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२६. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
२७. सर्व कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण)/जिल्हापरिषद
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२९. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३१. सर्व मंत्रालयीन विभाग,
३२. सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी, जलसंधारण विभाग
३३. कार्यासन जल-११ व कार्यासन जल-१९ जलसंधारण विभाग, मंत्रालय
३४. निवडनस्ती जल-७.